**एस्.सी.सी.क्र. ७९९/२०२२**
**<u>नि.१४</u>**

**शपथेवर सुरु -**
**सरकारतर्फे सा.क्र.२**
मी या व्दारे सत्य प्रतिज्ञेवर निवेदन करतो की
माझे नांव : राहुल बाबुलाल गुंजाळ,
वय : २६ वर्षे, धंदा - मजुरी ,
राहणार : खडका, ता. नेवासा, जि. अहमदनगर

**<u>सरतपास सरकारतर्फे सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती एस. पी.औताडे यांचे मार्फत</u>**

**<u>सुरु</u>** -

मला पोलिसांनी कुठेही बोलावले नव्हते. पोलिस खडकाफाटा येथील के.टी.संगम टोल नाक्यावर पोलिस आले होते तिथे पोलिसांनी माझी सही घेतली होती. मला माझी सही दाखवल्यास मी ओळखु शकतो. आता मला जप्ती पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी अनुक्रमांक २ वर सही आहे. मजकुराबाबत मला काहीही माहित नाही. सहीस **निशाणी १५** देण्यात येते.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करत नसल्यामुळे त्यास भारतीय पुरावा कायदा १८७२ कलम १५४ प्रमाणे पुरावा घेण्याची परवानगी अभियोग पक्षास विनंती वरुन देण्यात आली.**

हे म्हणणे खरे नाही की, दि. ०७/०३/२०२२ रोजी मला पोलिसांनी खडकाफाटा येथील के.टी. संगम टोलनाक्या जवळ बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, घटना ठिकण मला फिर्यादी सुखदेव व-हाळे यांनी दाखवले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर घटना ठिकाण के.टी. संगम टोलनाक्याच्या उत्तर बाजुस होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझे समक्ष घ टनास्थळ पंचनामा तयार केला व तो मला वाचुन दाखवला. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळ पंचनामा वाचुन त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास आरोपींतर्फे ॲड.डी.व्ही.देशमुख यांनी नाकारला-</u>**
**उलटतपास पूर्ण.फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती

सही/-
**( ए.एन.सरक )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
न्यायालय क्र.३ नेवासा

दिनांक :०३/०१/२०२५